म. ग्रं. सं. ठाणें

विषय
धर्म

संग्रहालय क्रमांक
[redacted]

सन
१८५२

लेखक प्र. गणपत कृष्णा
छा. मा. ज्ञा. मुंबई

पुस्तकाचें नांव विवाह प्रकरणी संवाद

४

धर्म

म. ग्रं. सं. ठाणें
नं. २५१९८



# लग्नप्रकरणीं संवाद.

॥ हतंज्ञानंक्रियाहीनंहतश्चाज्ञानतोनरः ॥
॥ हतंनिर्नायकंसैन्यंस्त्रियोनष्टाह्यभर्तृकाः ॥

ज्ञान असतां जो कर्म करित नाहीं, त्याचें ज्ञान व्यर्थ. ज्याला ज्ञान नाहीं, तो मानव असोन नाहींच, असा जाणावा. ज्या सैन्यांत नायक ह्मणजे रक्षणकर्ता नाहीं, तें सैन्य असोन व्यर्थ; कांकीं त्याचे हातून कांहींच, पराक्रम व्हावयाचा नाहीं ज्या स्त्रियाचे पती नाहींत, त्या जिवंत असून मृतच जाणाव्या.

मुंबईत
गणपत कृष्णाजी यांचे छापखान्यांत
छापिला.
शके १७८१

नं. ५१. १८—
मराठी ग्रंथ संग्रहालय
२९९२
ठाणे

# विवाहप्रकरणीसंवाद.

## प्रकरण १

### संभाषण १.

### संभाषण करणारे गृहस्थ.

श्रीधर लाडको ........ वराकडील यजमान

अनंतकृष्णंभट ........ श्री० ला० यांचा मित्र आणि मालवण येथील उपाध्ये.

बाळकृष्णकानोबा.... श्री० ला० यांचे चुलत जावयी.

### स्थल श्री० लाडको यांचेघर.

एकेदिवशीं प्रातःकाळीं श्रीधरबाबा हे आपले नित्य कर्म आटपल्यानंतर दिवाणखान्यांत कांहीं विचार करित बसले होते, इतक्यांत अनंतकृष्णंभट हे तेथें आले.

**अ० कृ०** बाबा, आज तूं नित्या प्रमाणें ग्रंथ

अवलोकन न करितां उगीच खिन्न होऊन विचारकरित बसला आहेस याचें कारण काय ?

श्री० ला० बाबारे, आमचे येथें या वर्षी चिरंजीव जगंन्नाथाचा विवाह करण्याचा बेत केला आहे परंतु अद्यापि तिथी वगैरे पाहणे आहेत. यास्तव ह्या मुलाची व मुलीची पत्रिका घे ? आणि यांस सत्कुट व यावर्षी चंद्रबळ कसें आहे तें पाहा.

अ० कृ० (पत्रिकापाहून) मुलास व मुलीस सत्कुट चांगलें आहे. आणखी यावर्षी गुरुबलही फार चांगले आहे.

श्री० ला० बरें तर, आतां तिथी कोणत्या अनकूळ येतील तें पाहा.

अ० कृ० (पुन:पाहून) यावर्षी माघमासीं मात्र शुद्ध २ व वा १० यातीथींस उभयतांस चंद्रबल चांगलें येतें; बाबा, तूं, ह्या अनंदाचे गोष्टीस विचारकरित बसला आहेस हे ठिकच आहे, पण खिन्न कां ?

श्री० ला० जापेक्षां मला हें कारण पुसलेंस त्यापेक्षां मला सांगण्यास काहीं अडचण नाहीं. आणि माझी अशी खात्री आहे कीं, तो खेद तूं दूर करशील.

अ० कृ० मी तो दुरकरण्यास समर्थ आहे असें

नाहीं. परंतु ज्याअर्थी तूं माझा यजमान व मित्र आहे-स त्याअर्थी मजकडून तुझें जितकें समाधान होईल, तितकें करण्यास मी कधींही आळस करणार नाहीं; तर आतां तुझें जें कांहीं सांगणें असेल तें सांग ?

श्री० ला० माझे वयास आज सुमारें पंचावन्न साठ वर्षे होत आलीं. हा माझे अयुष्याचा सर्वकाळ कोंकणामध्यें घालविला. तुमच्या लोकांचा सहवासानें, आणि शास्त्राचे आधारानें, जीं कर्मे मी पाहात आलों; आणि हल्लीं येथें जीं मी पाहातों, व मागें जीं मी पाहिलीं, त्या कर्मांशी व या कर्मांशी जर तुलना केली तर, आपल्या कोंकणांत मराठ्यांचे वरी जीं कर्मे चालतात, तीं आमच्या पेक्षां चांगलीं आहेत असें ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं.

अ० कृ० बाबा, तीं कशीं ?

श्री० बा० तीं अशीं कीं, भाद्रपद मासीं महालयांत जे पक्ष करितात; त्यांत गव्हांचे पिठाचे पिंड करितात. आपल्या कोंकणांत ब्राह्मण इ० भाताचे पिंड करितात. त्याप्रमाणें मीही करित असें आणि येथेंही तसेच केले. आपले तेथील शूद्र लोक तर तांदळाचे पिठाचे पिंड करितात. पण आमचा जातींत ग-

व्हांचे पिठाचे पिंड करित असतात. आणखी याचप्रमाणे कर्मांमध्यें ही पुष्कळ फेरफार आहेत. ते मी तुला काय सांगू; तुंला सांगितले ह्मणजे तुझी खात्री होईल.

अ० कृ० (आश्चर्यानें) अरे बाबा, मी नवीनच हें एक ऐकिलें! गव्हाचे पिठाचे पिंड करणे हें शास्त्रांत माझे आढळण्यांत कोठेंच आलें नाहीं. पिंड करण्यास सक्तूचे पीठ असावें तें सोडून गव्हांचे पिठाचे पिंड हें मोठें नवलच! (थट्टेनें) यापेक्षां मला असें वाटते कीं, यांत साकर व तूप घालून पिंड केले असतां त्यांत पुष्कळ फायदे आहेत. मग ते समुद्रांत ही टाकण्याची गरज नाहीं.

इतकें होत आहे इतक्यांत नैवेद्याची तयारी झाल्यामुळें उठून गेले.

## संभाषण २

### अनंत कृष्णं भट, श्रीधरलाडकोबा आणि बाळ कृष्ण कानोबा.

भोजनोत्तर कांहीं वेळ वामकुक्षी झाल्यावर श्रीधर बाबा हे ग्रंथ हातीं घेऊन अवलोकन करित ब-

सले आहेत; इतक्यांत तेथें बाळकृष्ण कानोबा हे आले.

श्री० ला० या, बसा. कसें काय वर्तमान आहे?

बा० का० वर्तमानतें कशाचें? नेहमीप्रमाणें मी आपल्या येथें येऊन आपल्या मुखांतून परमार्थ संबंधी ग्रंथ ऐकण्यास आलों आहें. परंतु मला आज नवल वाटतें कीं, इतकेदिवसपर्यंत आपण मला असें कधींच विचारलें नाहीं आणि आजच विचारतां हें काय?

श्री० ला० बाबारे कायसांगू! मी आज परमार्थाचाग्रंथ पाहाण्याचा एकीकडे ठेऊन कर्मार्थाचा ग्रंथ पाहात आहें.

बा० का० कर्मार्थाचा ग्रंथ तो काय? आणि तो वाचण्याचें प्रयोजन काय?

इतक्यांत अनंत कृष्णंभट हे तेथं आले.

अ० कृ० बाबा, आज प्रात:काळीं तुझें व आमचें बोलणे चाललें होतें त्याविषयीं मला आणखीं कांहीं विचारावयाचें आहे.

श्री० ला० विचार.

अ० क० आज प्रातःकाळीं आपले संभाषणांत पिंडप्रदानाविषयीं जें बोलणे झालें तें तुझे लक्षांत आहेच. परंतु त्यांत मला एक शंका उत्पन्न झाली आहे.

श्री० ला० ती कोणती ?

अ० क० ती अशीकीं, जीं कर्मे तुमचे येथें चालतात, त्यांचे प्रयोग **नारायणभटी** किंवा **महेश्वरभटी**, **शूद्रकमलाकरावरून** अथवा अन्यत्र ग्रंथांवरून चालतात ?

श्री० ला० याविषयीं मलाही संशय आहे. कां ह्मणशील तर ते प्रयोग नारायण भटी किंवा महेश्वर भटी प्रमाणें आपल्या कोंकणाकडे चालतांना पाहिले आहेत त्याच प्रमाणें येथें ( आमचा ज्ञातींत ) चालतात असें मला दिसत नाहीं. शूद्रकमलाकराप्रमाणें चालतातकिंकाय ? ह्मणून शूद्रकमलाकराचें पुस्तक पाहात आहें, आणखी तूं अन्यत्र ग्रंथाविषयीं ह्मणतोस तर तो ग्रंथ कोणता.

अ० क० शूद्रकमलाकराचें पुस्तक, शूद्रांस लागतें. तें पुस्तक तुला पाहाण्याची गरज काय ? नारायणभटी आणि महेश्वरभटी हीं ब्राह्मण व क्षत्रियांस लागतात. अन्यत्र ग्रंथाविषयींचे माझें बोलणे हेंच कीं,

ती कोणी एक कल्पितकादांबरी केली असलीतर ?

श्री० ला०

॥ तस्माच्छास्त्रंप्रमाणंतेकार्याकार्यव्यवस्थितौ ॥

॥ ज्ञात्वाशास्त्रविधानोक्तकर्मकर्तुमिहार्हसि ॥ १ ॥

गीता आध्याय १६ ॥ श्लोक २४ ॥

असें भगवद्वाक्य आहे. याजकरितां बाबारे जरीं शूद्रकमलाकराप्रमाणे चालत असलें तरी आह्मास तें कबूल आहे.

अ० कृ० बाबारे, तूं बोलतोस हें चांगलें आहे व यास शास्त्रप्रमाण आहे. ॥ अशास्त्रविहितंघोरंतप्यंतेयेतपोजनाः ॥ यावरून तूं शास्त्र विधी पाहतोस हें उत्तम आहे. अशास्त्र व अविधी कर्म केल्यास फार दोष आहे. याजकरितां शास्त्राधाराशिवाय कर्मकरूंनये.

श्री० ला० ह्मणूनच मी शास्त्राधार पाहात आहें.

अ० कृ० शास्त्र प्रमाण तर काय? तो नारायणभटीचे अगदी बरोबर असून फक्त त्यांत तंत्र आहे. वेदोक्त मंत्र नाहींत. वेदोक्त मंत्राबद्दल पुराणोक्त मंत्राची योजना फारचांगली केली आहे. या दोन्हीग्रंथांत सोळा संस्कार सारखे असून, मौंजी बंधनाच्या

संस्काराबद्दल छुरिका बंधनाचा संस्कार शूद्रकमला करांत आहे. मिळून सोळा संस्कार.

बा० का० (हें संभाषण ऐकून रागानें) काय, बाबा, तुह्मी आह्मास आजच शूद्रकरूं पाहातां कीं काय? असें झाल्यास जानवीं तोडावीं लागतील.

श्री० ला० बाळकृष्णजी रागाऊंनका. माझे बोलणे केवळ शूद्रकमलाकराप्रमाणें करावें असें नाहीं. परंतु तो ग्रंथ पाहाण्याची कांहीं जरूर आहे.

बा० का० (संतापानें) जरूर बिरूर कशाचें? आजदिन पर्यंत आपल्या वडलांनी चालविलें होतें तसें चालवावें. तें सोडून हा भलताच ग्रंथ कोठचा काढलात.

श्री० ला० आपल्या वडिलांनी कोणत्या ग्रंथाचे आधाराने कर्में चालविलीं असतील.?

बा० का० कोणत्या ग्रंथावरून काय? पुराणोक्तावरून.

अ० कृ० बाळकृष्णजी आपणास जर राग येणार नाहीं तर मी बोलतों.

बा० का० बोला आह्मास राग नाहीं.

अ० कृ० असें आहे तर ठिक आहे. तुमचा

जातीत गव्हाचे पिठाचे पिंड करितात; ते कोणत्या पु. राणोक्तांत आहेत.

वा० का० ( जरा मनांत वरमून ) तुह्मी ह्मणतां कीं, गव्हाचे पिठाचे पिंड कसे करितात. आमचा उ. पाध्या सांगतो त्याप्रमाणें.

अ० कृ० तर मला यावरून असें वाटतें कीं, उपाध्यानें सांगावें आणि तुह्मीं तें करावें. त्यास कां. हीं आधार असो अगर नसो; ॥ बाबावाक्यंप्रमाणं ॥ या हिशोबानें तर तुमचे जातींत सर्व गोंधळ असावा.

सूर्य अस्त होण्याचा समय अल्यामुळें, नित्य कर्मास उठून गेले.

## संभाषण ३

### श्रीधर लाडको आणि अनंत कृष्णंभट

रात्रो जेवण झाल्यानंतर श्रीधर बाबा दिवाण खान्यांत येऊन बसले. इतक्यांत अनंत कृष्णंभट हे ही तेथें आले.

अ० कृ० कायरे बाबा, आज दोन प्रहरीं बा. ळकृष्ण इतका तापला याचें कारणकाय ?

श्री० ला० त्याचें बोलणें खरें आहे. तो दो.

नरहरीं तापून ज्या गोष्टी बोलला त्याप्रमाणें त्याची कृती नाहीं. तो आपले येथें वेदोक्त कर्म करितो कारण त्याणे आपले आयुष्यापैकीं कांहीं काळ ह्या मुंबई बंदीखान्या बाहेर घालविला आहे. याजमुळें त्यास सर्व माहिती आहे.

अ० कृ० बाबा, मुंबई बंदीखाना ह्मणजे काय ?

श्री० ला० मुंबई बंदिखाना ह्मणजे जे लोक मुंबईचे बाहेर गेले नाहींत; आणि मुंबईत राहून ज्याणीं आपल्या कर्तव्य कर्मांचा विचार केला नाहीं; हाच मुंबई बंदीखाना.

अ० कृ० बाबा, आतां तूं लाक्षणीक बोललास तें मी समजलों नाहीं. उघड करून सांग ?

श्री० ला० जे लोक मुंबई सोडून बाहेर गेले नाहींत; व बाहेरील लोकांच्या रीति भाती पाहिल्या नाहींत त्यांस यागोष्टीची माहिती कशावरून असणार, त्यांणी हपीसांत जाऊन काम करून वरीं यावें. बाकीं गोष्टीची माहिती ( हव्य कव्य इ० देवधर्म व कार्य प्रयोजन ) जर विचारणें असल्यास वायकांस विचारतात. परंतु त्यांस असें समजत नाहीं कीं, आपण कोण, करितों काय ? याचा विचार ते कांहींच करि-

न नाहींत. तशांत यांतून ही जे सुज्ञ, विचारशील आणि निष्पक्षपाती असे जे आहेत; तेमात्र याकर्माचा विचार करितात आणि त्याप्रमाणें आचरतात. बाकीचे

॥ गतानुगतिकालोकानलोकाःपारमार्थिका ॥

॥ वालुका लिंगमात्रेणगतंमेताम्रभाजनं ॥ १ ॥

हें जसें सन्याशास जाहालें तसें या लोकांस.

अ॰ कृ॰ तूं ह्मणतोस तें खरें; पण त्यांस माहीती नसेलतर ?

श्री॰ ला॰ जांस माहिती नसेल त्यांणी माहिती करून घ्यावी. व कित्येकांस याविषयीं माहिती असोन डोळे झांकतात त्यास उपाय काय. ?

अ॰ कृ॰ जास माहिती आहे त्याणे शास्त्रप्रमाणें करावें. आणि जांस माहिती नाहीं, त्याणी माहिती करून शास्त्राप्रमाणें करावें. हें यथान्याय व शास्त्रप्रमाण आहे. परंतु जांस माहिती आहे ते करितात काय ?

श्री॰ ला॰ कित्येक करितात कित्येक करित नाहीं ?

अ॰ कृ॰ तरमग जास माहिती असून करित

नाहींत तर ते शास्त्रप्रमाणानें दोषी आहेत. बरें तूं कसें करणार ?

श्री० ला० मी तर यथाशास्त्र यथाविधी करणार. न केल्यास त्याप्रमाणें मी दोषीहोईन.

अ० कृ० बरें, तर, तुझे नवे व्याही कसें करणार. ?

श्री० ला० ते पूर्व दिवशीं कसें कां करित नात्याविषयीं माझें कांहीं ह्मणणें नाहीं. पण, वर, त्यांचे मांडवांत गेल्यापासून परत येईतों पर्यंत त्यांहीं यथाशास्त्र केलें ह्मणजे झालें.

अ० कृ० तूं जें ह्मणतोस त्याप्रमाणें ते करण्यास कबूल आहेत हें कशावरून ?

श्री० ला० याविषयीं उद्यां त्यांस विचारून जें कांहीं करणें असेल तें करूं.

अ० कृ० उद्यां मला सदर आदालतींत जावयाचें आहे यास्तव मी आतां लवकर झोपेस जातों.

असें ह्मणून ते उठून गेले.

# प्रकरण २

## संभाषण ४

### संभाषण करणारे गृहस्थ.

श्रीधर लाडको ..........वराकडील यजमान.
अनंत कृष्णंभट ......मालवणयेथीलउपाध्ये
सुंदर दामोधरजी .........वधूकडील यजमान
बाळकृष्ण कानोबा.... श्री. ला. यांचे चूलतजांवई
विठल हरी केळकर ........कारकुन

### स्थल--श्री० ला० यांचे घर.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं स्नान संध्येस जाण्याचे पूर्वीं सुंदरजीस बलावण्याकरितां श्रीधर बाबानी विठल यास पाठविलें.

विठल निघून जातो. तेथें पोचल्यावर श्रीधर बाबाचा निरोप सुंदरजी यांस सांगून त्यांणी येतों ह्मणून सांगितलें.

येथें श्रीधर बाबा यांची स्नान संध्या आटपल्यानंतर नित्याप्रमाणें दिवाणखान्यांत येऊन बसले आहेत तों सुंदरजी आले.

श्री० ला० या, बसा सुंदरजी.

सुं०दा० बाबा मलाकशास बलाविलेहोतें.

श्री० ला० तुह्मास इतक्यासाठीं बलाविलें आहेकीं.

ह्याअशा तिथी आहेत. ह्मणून आतां आपल्यास तयारींत असले पाहिजे कारण माघमासास आतां फारदिवस राहिलेनाहींत. परंतु तुह्मास आमचें हेंच सांगणे आहेकीं, जेकाहीं आपणाकडे करणे आहे तें यथाशास्त्र यथाविधी केलें ह्मणजे ठिक आहे.

सुं०दा० यथाशास्त्र यथाविधी ह्मणजे काय? आह्माला शास्त्रबिस्त्र कांहीं समजतनाहीं. तें उपाध्याचें उपाध्यानेंच पाहवें.

श्री० ला० तंखरें, परंतु उपाध्ये तें नपाहातां तेजर भलतेंच करूंलागले तर मगतसें करावें कींकाय?

सुं० दा० इतकेदिवस त्यांणी चालविलें तें भलतेच रितीने चालविले काय?

श्री० ला० गैरवाजवी चालविता असें मलावा·

सुं० दा० तंकसें. आपले वाडवडील इतके व·

षें चालवित आले तेव्हां त्यांणी गैरवाजवी कांह्मटलें नाहीं.

श्री० ला० तें असें कीं, आपले येथें भाद्रपद मासांत माहालयांत जे गव्हांचे पिठाचे पिंड करितात ते कोणतेही शास्त्रांत नाहीं. याप्रमाणें आणखी पुष्कळ गोष्टी आहेत. आतां तुह्मी ह्मणतां कीं, आपले वाडवडील चालवित आले त्यांस याविषयीं माहितीच नव्हती. व जेव्हां मी पंधरा सोळा वर्षांचा होतों, तेव्हां आपला उपाध्या जे प्रयोग चालवित असे ते शास्त्र प्रमाणे चालवी असें मला वाटे. परंतु जेव्हां मी प्रौढवयांत येऊन पुष्कळ वर्षेपर्यंत पर देशांत राहून तेथील लोकांचारीति भाती पाहूं लागलों तों त्या रीति भातीशी व यारीतिशी अगदीं जमत नाहीं. आपले येथील हव्य कव्यें तेथील कोळी, कुळबी, व मराठे करितात त्याप्रमाणे आहेत. तव्हां ते आपल्या पेक्षां श्रेष्ठ आहेत असें ह्मणण्यास अडचण नाहीं.

सुं० दा० तुह्मी ह्मणतां हें सर्व खरें असेल; परंतु आह्मास शास्त्रांत काहीं समजत नाहीं. आमचाकडेस भट्टाने कसें ही केलें तरी चालतें.

श्री० ला० तुमचे येथें पूर्व दिवशीं तो कसें कां

करीना परंतु आह्मी बोलतों हें बोलणे रास्त असेल तर पत्कारावें. नाहीं पेक्षां आमचा वर तुमचे येथें आ-ल्यापासून तों परत आमचे घरीं येईतोंपर्यंत यथाविधी केलेंत ह्मणजे झालें.

सुं० दा० मी याविषयीं उपाध्यास सांगतों आणि त्यास तुह्माकडेस पाठवितों नंतर तुह्मी व ते पाहिजेत तसें करा. ते जर कबूल करित असतील तर आ-मचेकडून काहीं हरकत नाहीं.

श्री० ला० ठिक आहे. आह्माकडे लौकर पा-ठऊन द्या ह्मणजे आह्मास सामान सुमान करण्याची तयारी करण्यास बरें पडेल. तोंपर्यंत आह्मी दुसरा कोणता विचार करित नाहीं.

सुं० दा० एकदोन दिवसांत पाठऊन देतों. अ-सें ह्मणून ते निरोपघेऊन जावयास निघतात.

सुंदरजी गेल्यानंतर अनंत कृष्णंभट आले. त्यां-ला झालेली सर्व हकिगत श्रीधर बाबानी सांगितली.

अ० कृ० ( ती ऐकल्यानंतर ) कायरे बाबा, यास तर कर्माविषयीं व शास्त्राविषयीं काहींच समजत नाहीं.

श्री० ला० समजेल कशावरून, तुमचे सारख्या-

चे सहवासाशिवाय हें समजणे कठीणच आहे. हें मी आपल्या तिसऱ्या संभाषणांत दर्शविलेंच आहे.

अ० कृ० तें जर यथाशास्त्र रास्त बोलणे आहे तर त्याणें तें आनंदाने स्वीकारावें.

॥ यःशास्त्रीविधी मुत्सृज्य वर्तते कामकारतः ॥

॥ नससिद्धिमवाप्नोति नसुखंनपरांगति ॥१॥

तसें नकरितां हमरा बापने किंवा येसच्या असें च जर बोलूंलागले आणि भगवद्वाक्यावर लक्षदिलें नाहीं तर हें नवल !

अनंत कृष्णंभट यांस सदर आदालतींत जावयाचें होतें ह्मणून ते निघून गेले. आणि श्रीधर बाबा भोजनास गेले.

## संभाषण ५

### श्रीधर लाडको, अनंत कृष्णंभट आणि बाळकृष्ण कानोबा.

नित्या प्रमाणें दोन प्रहरीं ग्रंथ अवलोकन करित बसले आहेत इतक्यांत बाळकृष्णजी आले. त्यांस प्रातःकाळीं झालेलें वर्तमान निवेदन केलें. तों अनंत कृष्णंभटही आले.

अ० कृ० ( आनंदानें ) अरे बाबा आजमी स- दर अदालतींत गेलों तो चांगला शकून पाहून गेलों होतों. व त्याप्रमाणें कामही झालें. तूं बाळकृष्ण जीस सकाळची हकीगत सांगितलीस काय ?

श्री० ला० तूं येण्याचे पूर्वींच सांगितली.

अ०कृ० बाळकृष्णजी तुह्मी सकाळची हकीक- त ऐकलीतना ?

बा० का० होय ती सर्व ऐकली.

अ० कृ० बरें तुमचे येथें जीं कार्यें होणार तीं कशीं चालिवणार तें मला समजूंद्या.

बा० का० आह्मी तर आमचे येथें वेदोक्त कर- णार आणि मजकडे मागें एकदोन कार्यें झालीं तीं मी वेदोक्त केलीं. आणि पुढेंही तसींच करणार. परंतु श्रीधरबाबांचें असें ह्मणणे आहे कीं, पुराणोक्ताप्रमाणे केलें तरी चालेल. कालचे बोलण्यांत बाबांनी नविनच शूद्रकमलाकर ग्रंथ काढला. आणि आपलेहून आप- ण शूद्र होऊं पाहातात.

अ० कृ० अरे बाबा, पाहा तुला हे कसे दोष लाऊन बोलतात ते. वा ! मी असें समजत होतों कीं तुमचा ज्ञातींत सर्व विचार शून्य आहेत, असे मला

भासत होतें. परंतु तसे नहोता विचारवंत आहेत असें मला वाटतें.

श्री० ला० आमचा ज्ञातींत विचारवंत आहेत; परंतु उपाध्यामुळें त्यांचे विचार एकीकडे राहिले आहेत.

बा० का० बाबा, तुह्मी असें कां ह्मणतां, हें यजमानाकडे आहे. यजमानाची इच्छा आपले येथें यथासांग कर्म करण्याचें असलें तर त्यास उपाध्या, काय करणार आहे? त्याणें जर नकेलें तर, त्याचा काका दुसरा, त्याचेच आपण कांहीं बांधलेलें नाहीं. आपण आपल्या कर्मानें बांधलेले आहों.

श्री० ला० बाळकृष्णजी, तुह्मी असें ह्मणतां कीं आह्मी आपलेहून शूद्र होऊं पाहतों; हें जें तुमचे बोलणें गैरवाजवी आहे असें नाही. कारण जर मी वेदोक्ताविषयीं ह्मणेन तर सुंदरजी तें कबूल करणार नाहीं. ह्मणून त्यांस यथाशास्त्र यथाविधी करा असें सांगितले. त्यास त्याणीं उपाध्याचा विचार घेऊन काय तें सांगूं, नाहीं तर तुह्माकडेस पाठऊन देऊं असें ह्मणाले. मला पक्कें ठाऊक आहे कीं, आपले उपाध्ये माहादेवभट हे तर वेदोक्ताविषयीं कधींही

कबूल करणार नाहीत. अणखी याविषयीं त्यांची प्रतिज्ञाही आहे. बरें तें कसेंही असो. आतां तिकडून उपाध्ये येऊन काय होत आहे तें पाहावें.

बा० का० आपला पुरोहित आपणाकडेस बराबर रीतीने न चालतां जर तो आपणास खोटा मार्ग दाखवितो तर तोआपला पुरोहित कशाचा ! बाबा तुह्मी कसें करणार ?

श्री० ला० मी माझे येथें तर वेदोक्त करणार. व तें आह्माक्षत्रीयांस करण्यास कांहीं प्रतिबंध नाहीं. अशी माझी पुष्कळ ग्रंथावरून व आपल्या चालीवरून आणि उपाध्या आपल्या येथें कर्मांतजीं तंत्रें करितो त्यावरून खात्री झाली आहे. पण जर सुंदरजीस वेदोक्ताविषयीं सांगितलें तर ते करण्यास हरकत करतील. कारण कीं त्यांणी ह्मटलें आहे कीं, उपाध्याचें उपाध्या जाणो. तेव्हां उपाध्या कबूल करणार नाहीं, हें तर खचीत आहे. ह्मगून पुराणोक्त कां होईना ? पुराणोक्त कसें करितात तो ग्रंथ पाहिल्यानंतर काय आहे तें समजेल.

बा० का० तुह्मी ह्मणतां तें खरें. उपाध्यानें ग्रंथ

दाखविला नाहीं आणि सुंदरजीस तुह्मी सांगतां तसें त्याणे ऐकलें नाहीं तर मग काय करणार?

श्री० ला० हा विचार त्यांचे जबाबा पुढील आहे.

अ० कृ० होय प्रथम त्याचा जबाब तर येऊंदे. उगीच त्याचा वादविवाद आतां कशास पाहिजे.

संध्याकाळ झाल्यामुळें सर्व निघून जातात.

# प्रकरण ३

## संभाषण ६

### संभाषण करणारे गृहस्थ.

श्रीधर लाडकोबा ...... वराकडील यजमान

सुंदर दामोधरजी ...... वधूकडील यजमान

विठल हरि केळकर ....... कारकून

गणेशपंत } ...... सुंदरजी यांचे कारकून

अंताजीपंत }

स्थल. श्रीधर लाडको व सुंदर दामोधर यांचे घर.

सुंदरजीनें सांगितल्याप्रमाणें दोन तीन दिवस झाले तत्रापि उपाध्येहे आले नाहींत व कांहीं समजलेंही नाहीं. ह्मणून श्रीधर बाबा याणीं विठल हरी यास सुंदरजीचे येथें पाठविलें.

सुंदरजीचे घरीं जाऊन चौकशी करून घरी परत आल्यानंतर बाबास सांगतो.

वि० ह० सुंदरजीचे घरीं चौकशी केली. ते माहिमास गेले आहेत. असें त्यांच्या घरांतील मनुष्यांनीं सांगितलें.

श्री० ला० ते येतील केव्हां याविषयीं तुला कांहीं सांगितलें आहे?

वि० ह० होय, ते माहिमास उरसास गेले आहेत; अद्यापि आले नाहींत सायंकाळीं किंवा उद्यां येतील.

श्री० ला० बरें तर, उदईक जाऊन तूं चौकशी कर, आणि आले असल्यास मी त्यांस बलाविलें आहे ह्मणून सांग.

विठ्ठलपंत सांगितल्याप्रमाणें दुसऱ्या दिवसीं बारा वाजतां तेथें गेले. गेल्यानंतर चौकशी करतात तंव ते जेवायास बसले होते. ते बाहेर आल्यानंतर त्यांस निरोप कळाविला.

सुं० दा० बाबास सांगाकीं, माझें माथें दुखत आहे. याजकारितां माझानें येववत नाहीं. त्यास तुह्मास इकडे बलाविलें आहे ह्मणून सांगावें.

विठलपंत येऊन निरोप सांगतात त्याप्रमाणें श्रीधर बाबा सुंदरजीचे घरीं गेले.

## संभाषण ७

### सुंदरजी, श्रीधर बाबा, गणेशपंत आणि अंताजीपंत

सुं० दा० याबसा, मला कशाकरितां आपण बलाविलें होतें.

श्री० ला० तुह्मास इतक्याकरितां बोलाविलें होतें कीं. आपण एकदोन दिवसांत उपाध्ये यांजला आह्मांकडे पाठविणार होतेत; त्यास आज पांचसाहा रोज होऊन गेले. तरी अद्यापि त्यांस आपण पाठविलें नाहींत. याजकारितां.

सुं० दा० मी माहादेवभटजींस आपणाकडेस जाण्यास सांगितलें परंतु ते ह्मणाले कीं, आह्मास श्रीधरबाबानी बोलावण्यास पाठविलें असतां आह्मी जाऊं.

श्री० ला० आह्मीच उपाध्यांस बलावयास पाठविलें पाहिजे असें नाहीं. त्यांणी यजमानाचे येथें जातयेत असावेंच.

सुं० दा० अहो, त्यांचा तुह्माकडे नयेण्याविषयीं हट्ट आहे असें नाहीं. परंतु याकामीं त्यांचें ह्मणणें

असें आहे कीं आह्मास श्रीधर बाबा यानी बोलवावयास पाठविलें ह्मणजे आह्मी जाऊं.

श्री० ला० या कामाकारितां माहादेवभटजी हे आमचे येथें येत असत आणि आतांच त्यांस बलावणें कशास पाठविलें पाहिजे. तशांत हे आपले पुरोहित; ह्मणजे यजमानाचें पुरें हीत इच्छिणार ते पुरोहित. असें असतां तुह्मीही त्यांजला आह्माकडे येण्याविषयीं सांगितलें असून, ते आले नाहींत. ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. बरें असो त्याविषयीं आमचें कांहीं फारसें बोलणें नाहीं. तुह्मी शास्त्रविधियुक्त कर्म केलेंत ह्मणजे झालें.

सुं० दा० आपल्या वाडवडिलांनी केलें तसें आह्मी करणार; आह्मास दुसरें तिसरें कशास पाहिजे? जें वडीलकरीत आले तें खरें.

श्री० ला० असें जर तुमचें ह्मणणें आहे तर वडील चालवित आले त्याप्रमाणे तरीं करा?

सुं० दा० वडील जाप्रमाणें करित आले त्याप्रमाणे आह्मी करितच आहों.

श्री० ला० अहो, वडील जे करित होते, त्यामध्यें आतां पुष्कळ फेरफार झालेआहेत. आणिते फे-

रफार एकेच दिवशीं व एकेच वेळीं झाले असें नाहीं; ते हळूहळू कमी होत आले आहेत.

सुं० दा० वडील जीं कर्में करित होते त्यामध्यें कोणकोणते फेरफार झाले आहेत?

श्री० ला० अहो तुह्मीं असें पाहाकीं, आपले वडिलामध्यें मागें, घरणी उल्हास, गोड तोंड, खाजी इ० हीं समूळच नाहींसीं झालीं आहेत. त्याचप्रमाणें दुसऱ्या कितीएक चाली नाहींशा होण्याचा संभव दिसत आहे. आतां खाजाचे बद्दल बतासे घेतात आणि देणऱ्या जांवयास कबूल करितात. याचप्रमाणें आणखीही चाली नवीनच झाल्या आहेत. ह्यांस कोणी वाईट ह्मणतात कीं काय?

सुं० दा० ह्या वाईट कशा ह्मणतील.

श्री० ला० पण ज्यावेळीं ह्या चाली ज्यांणी मोडल्या असतील त्यावेळीं त्यांस कित्येकांनीं वाईट ह्मटलें असेल. परंतु आतां त्यास कोणी वाईट ह्मणतो कीं काय?

सुं० दा० होय. ज्या चाली मोडल्या त्या वाईटच होत्या तुह्मी ह्मणताकीं शास्त्राप्रमाणें विधी करावा त्याप्रमाणें महादेवभटजीही करीतच आहेत.

श्री० ला० ते जर त्याप्रमाणें करित आहेत

तर, जाग्रंथावरून करितात तो ग्रंथ त्यांणी आह्मास दाखवावा. जर तो यथाशास्त्र आसला तर तो आह्मास शिरसावंद्य आहे. आमचें याशिवाय कांहींच बोलणें नाहीं.

ग० पंत० श्रीधरजी जें बोलतात तें बरोबर आहे त्याप्रमाणें महादेवभटजी यांणी ग्रंथ दाखवावा.

सुं० दा० होय तुमचें बोलणे ठीक आहे. त्यांणीं ग्रंथ दाखवावा याविषयीं त्यांस विचारून काय तो जबाब कळवीन.

श्री० ला० माझी पक्की खातरी आहे कीं महादेवभट ते पुस्तक दाखविणार नाहींत. आणि तुह्मी जर यथाविधी केलें नाहीं तर तुमचें व आमचें जमणार नाहीं.

सुं० दा० जमणार नाहीं ह्मणजे काय? माहादेव भटजीनें पुस्तक दाखविलें नाहीं आणि विधियुक्त केलें नाहीं तर रामभटास बोलवावें कीं काय? आह्मीतर आमचे येथें रामभटास बलावणार नाहीं. व तुह्मीही त्यास आह्माकडेस घेऊन येऊंनये.

श्री० ला० तुमचा जर भटाविषयीं आग्रह आहे तर, आह्मी रामभटजीस आणणार नाही. आमचे

दोन्ही उपाध्ये आहेत. तर भटाविषयीं आह्मासे आग्रह कशास पाहिजे. परंतु आमच्या वहिवाटीप्रमाणें ह्या लग्नास रामभटजी हे आहेत. आणि पुढें दुसरें कार्य होईल तें महादेवभटजीचे आहे. वर, तुमचायेथें आल्यानंतर दोन्ही उपाध्यांची जरूर असती परंतु तुह्मी ह्मणताकीं आमचे येथें रामभटानें येऊनंये; तुमचे आग्रहास्तव रामभटजीस आणणार नाहीं, त्यास दुसरे रीतीनें समजाऊ. तुह्मीयथाशास्त्र महादेवभटजीकडून करविलेंत ह्मणजे झालें. जर तुह्मी तसें नकेलेतर तमची आमची सोयरीक तुटेल.

सुं० दा० असें आहे तर महादेवभटजीस आपणाकडेस ग्रंथ घेऊन पाठवून देतों.

असे ठरल्यावर श्रीधर बाबा घरीं निघून आले.

# प्रकरण ४

### संभाषण ८

## संभाषण करणारे गृहस्थ.

अनंत कृष्णभट .. मालवण शहराचे उपाध्ये, धर्माधीकारी, ज्योतिषी, कुलउपाध्ये आणि माहाजन.

विठ्ठ हरी केळकर .. कारकुन आणि माधवरा-
वाचा मित्र.

माधवराव श्रीधर .. श्रीधर लाडको यांचा मुलगा

सुंदर दामोधर ...... वधूकडील यजमान.

दादा भट. उर्फ बाळंभटमाहादेवभट. माहादेवभट
क्षत्रीय ज्ञातीचे उपाध्ये यांचे चिरंजीव.

श्रीधर लाडको ...... वराकडील यजमान.

कृष्णाजी रामचंद्रजी .. श्रीधर लाडको यांचे जांवई.

हरी चंद्र भाऊ सराफ .. श्रीधर लाडको यांचे जांवई.

## स्थल सुंदर दामोधर आणि श्रीधर

## लाडको यांचेघर

एक दोन दिवस झाले तथापि सुंदरजी यांणी म-हादेव भटजीस पाठविलें नाहीं ह्मणोन वेद मूर्ती राजे-श्री अनंत कृष्णभट्ट अभ्यंकर, विठलहरी केळकर, आणि माधवराव श्रीधर. यांहीं सुंदरजी यांचे घरीं जा-ण्याचा संकेत करून तेथें गेले. विठल हरी सुमारें बा-रावाजतांना जाऊन त्यांणी गणेशपत यांस असें सां-गितलें होतें कीं भटजीस तुह्मी बलाऊन आणा, आह्मी

एक दोन वाजल्याचा सुमारास येतों. त्यावेळेवर ते तेथें गेले.

वि० ह० (कारकुनास विचारतो) अहो तुह्मास मी मगांच सांगितल्या प्रमाणें तुह्मी माहादेव भटजीस बलाऊन आणलेत आहां कीं नाहीं?

ग० पं० इतकावेळ यजमान घरीं नव्हते; आतांच आले आहेत. त्यांजला विचारून बलावण्यास पाठवितों, असें ह्मणून आंत गेले आणि यजमान बाहेर येऊन सर्व मंडळीस बसविलें.

वि० ह० मी मगा माहादेव भटजी यांस बलाऊन आणण्याविषयीं गणेशपंत यांस सांगितलें होतें.

सुं० दा० मला त्यांनीं नुकतेंच सांगितलें कारण मी बाहेर गेलों होतों; तो नुकताच आतां घरीं आलों. असें बोलून गणेशपंत यांस महादेवभटजीस बलावण्याकरितां पाठविले.

गणेशपंत यांणी महादेव भटजीची चौकशी केली, ते घरांत नसल्यामुळें त्याचे चिरंजीव दादाभटजी आले.

अ० कृ० (दादाभटजी येऊन बसल्यानंतर) आह्मी कशास आलों हें तुह्मास समजलें काय?

दा० भ० तुह्मी येण्याचे कारण काय तें कळूं द्या. मी केवळ तुमचे मुलासारखा आहें. मजकडून बोलण्यांत कांहीं कमजास्त झाल्यास क्षमा असावी. मला यथा मती करून जें माहित आहे तें मी सांगेन.

अ० कृ० तुह्मी बोलतां हें ठिकच आहे. आह्मी अशाकरितां आलों आहों कीं, दोन्ही यजमानाचें जमून कार्य लवकर शिद्धीस जावें इतकाच हेतू आहे.

दा० भ० तो, कोणता?

अ० कृ० तो असा कीं, तुह्मी पुराणोक्त जें कर्म चालवितां तें कोणत्या ग्रंथावरून, तो ग्रंथ आह्मास दाखवावा.

दा० भ० आह्मास ग्रंथ ग्रिंथ कांहीं माहित नाहीं. जें आह्मास आमचे वडिलांनीं शिकविलें आहे, त्याप्रमाणें चालवितों.

अ० कृ० अहो, तुह्मास तुमचे वडिलांनी ग्रंथाशिवाय शिकविलें?

दा० भ० होय, फक्त तोंडानेंच आमचे वडिलांनी आह्मास शिकविलें.

अ० कृ० अहो, तुह्मास तोंडानें शिकविलें खरें. परंतु तुमचे घरांततरी पुस्तक आहे कीं नाहीं?

दा० भ० आमचे घरांत याप्रकरणाचीं पुस्तकें मुळींच नाहींत. फक्त शांतीविषयीं मात्र आहेत.

अ० कृ० अहो. लग्नाचे प्रयोग वगैरे कर्में तुह्मी पुस्तकाशिवाय चालवितों ह्मणून सांगतां ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. शास्त्राप्रमाणें ह्मटलें असतां कोणतेंही कर्म पुस्तकाशिवाय होत नाहीं. कारण चुक समजतनाही. तेव्हां कर्मास सादृश्य वगैरे पाहिजेत.

दा० भ० आह्मी जीं कर्में चालवितों तीं आह्मास तोंडपाठ येतात मग पुस्तक कशास पाहिजे.

अ० कृ० हें मी आजच नवल ऐकलें. आजपर्यंत असें कोठें पाहिलें नाहीं व ऐकिलेंही नाहीं.

सुं० दा० अहो, त्यांस तोंडपाठ येत असतां ते पुस्तक कशास घेतील. आणि त्यांजकडे असलें तरीं ते दाखविणार नाहींत. काय न्हाव्याचे धोकटी सारखें बगलेंत घेऊन जिकडे तिकडे दाखवावयाचे आहे, तें तुह्मास पुस्तक कदापि दाखविणार नाहींत.

अ० कृ० अहो त्याणे आह्मास पुस्तक दाखविलें नाहींतर त्यांत आमचा तोटा आहे असें नाहीं. तुमचाच तोटा आहे. अहो दादाभटजी तुह्मी जा ग्रं-

थाप्रमाणें चालवितां तो ग्रंथ दाखविण्यास तुह्मास अड-चण कोणती.

सुं० दा० आह्माजवळ मुळींच ग्रंथ नाहीं.

अ० कृ० बरें तुह्माजवळ मुळींच ग्रंथ नाहीं; तुह्मास तोंडपाठ येतेना ? तर ज्याप्रमाणें तुह्मी प्रयोग चालविणार तो आह्मास ह्मणून तरी दाखवा ह्मणजे आह्मी लिहून घेऊं अगर ऐकूंतरी.

दा० भ० असें काय उगीच ह्मणावयाचे आहे ?

अ० कृ० तर तुह्मी कसें चालविणार, हे आह्मास कशावरून समजेल.

दा० भ० ज्यावेळे समय येईल चार शास्त्री बसावावे आणि पुराणोक्ताप्रमाणें नसल्यास तुह्मी जें सांगाल तें प्रायश्चित करीन व मिशी काढीन.

अ० कृ० इतकी जर तुमची प्रतिज्ञा आहे; तर दाखविण्यास अडचण कोणती. तुह्मी ह्मणाल कीं" त्व मूर्खोसी" ह्यादक्षणा. असें ह्मटल्यास मग आयतेवेळीं काय करावें. तुह्मी ह्मणाल कीं हें आह्मास आमचे बापानें शिकविलें आह्मी काय ग्रंथावरून शिकलों ? येथें आह्मी निरूत्तरहोऊं, कांकीं तुमचे ह्मणणें असें आहे कीं आह्मास आमचे बापाने शिकविलें आणि आमचा